सं.फौ.प्र.क्र.३९८/२०२४
सरकार/प्रफुल
निशाणी – १० खाली

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: रंजना धनराज हणवते,
वयः ४२ वर्षे, व्यवसायः गृहिणी,
निवासस्थान: आनंदवन, वरोरा, ता. वरोरा, जि. चंद्रपुर.

**शपथेवर सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती पी. व्ही. गंधारे यांच्यामार्फत**

मी आरोपीला ओळखते. बबन केशव घरत यांनी मला आरोपी दवाखान्यात दाखविला होता. घटना दिनांक ०८.०३.२०२४ रोजी कळंबगाव ते नेरी रस्त्यावर सकाळी ०७.३० वाजताच्या सुमारास घडली होती. त्यावेळी मी गडचिरोलीला होती. मला माझा मुलगा अनिरुधने फोन करुन सांगीतले होते की, माझ्या पतीचा अपघात झाला व ते जागेवरच वारले. त्यानंतर मी व माझे मुल गाडीकरुन चिमूर येथील सरकारी दवाखान्यामध्ये आलो. त्यावेळी माझ्या पतीचे प्रेत मला दाखविण्यात आले होते. त्यांच्या चेह–यावर, पायाला व हातावर मार लागला होता. मला माझ्या पतीच्या सोबत असलेले बबन घरत यांनी सांगीतले होते की, ते मजुराचे पैसे द्यायला जात असतांना ट्रकने अपघात झाला होता. पोलीसांनी चौकशी दरम्यान माझे बयाण नोंदविले होते.

**आरोपीतर्फे उलटतपास श्री. एस. टी. नन्नावरे वकील यांच्यामार्फत**

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनेच्यावेळी घटनास्थळावर उपस्थित नसल्यामुळे नेमकी घटना कशी घडली होती याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामुळे बबन घरत यांची मानसीकता व्यवस्थीत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आरोपीच्या ओळखीबाबत मला बबन घरत यांनी सांगीतले असे मी खोटे सांगीतले.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही

**सा.वा.दा.व.ब.अ.क.के.** **माझे समक्ष**

**(आर. डी. भुयारकर)**
न्यायदंडाधिकारी प्र. श्रे., चिमूर.
दि. १०.०८.२०२६

**(आर. डी. भुयारकर)**
न्यायदंडाधिकारी प्र. श्रे., चिमूर.